**विशेष दिवाणी दावा क्र.२०/२०२६ मधील नि.३३ खालील आदेश**
**शंकर गणपत पवार वगैरे वि. गणपत दादा पवार वगैरे**
**CNR NO.MHST050000732026**

प्रतिवादी क्र.३ याने सदरचा अर्ज दावा मिळकतीमध्ये जैसे थे (status quo) चा आदेश मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. सदरचा दावा वाटपाकरीता व जाहीर ठराव होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. परंतु वादी यांनी सर्व सामाईक अगर एकत्र कुटुंबाच्या मिळकती दाव्यात समाविष्ट केलेल्या नाहीत. गट क्र.७३ ही सामाईक मिळकत आहे आणि त्यामध्ये वाटप झालेले नाही. सदरची मिळकत दाव्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाही. सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.३ यालाही हक्क व हिस्सा प्राप्त होतो, परंतु सदरची मिळकत वादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांचेकडून खरेदी घेतलेली आहे. सदर मिळकतीमध्ये वाटप न करता बांधकाम करीत आहे. सदरचे बांधकाम पूर्ण झाल्यास फोर्सफुली पार्टीशन झाल्याप्रमाणे होणार आहे. नि.२६ वर प्रतिवादी क्र.३ ने तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल केला आहे. यामधील नि.२६ वरील आदेश होईपावेतो स्टेटस को ठेवण्याबाबत सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०३. संधी देवूनही वादीतर्फे म्हणणे दाखल करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

०४. अर्ज, दावा व अभिलेखावरील कागदपत्रे पाहता गट क्र.७३ हा सुरुवातीला गणपत दादा पवार म्हणजेच वादी व प्रतिवादी यांचे वडील यांच्या नावे दिसून येतो. परंतु नंतर गणपत दादा पवार यांच्या नावे कंस होवून त्याचे जागी शंकर गणपत पवार व मधुकर गणपत पवार ही नावे दिसून येतात. ७/१२ वरील नोंदींवरुन गट क्र.७३ ही वडिलार्जित मिळकत

आहे की गणपत पवार यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे हे दिसून येत नाही. तसेच सदरची मिळकत दावा मिळकतीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाही. सदर मिळकतीबाबत प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल केलेला नाही. गट क्र.७३ ही वडिलार्जित मिळकत आहे की गणपत पवार यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे हे सकृतदर्शनी कळत नाही. अशा परिस्थितीत स्टेटस को सारखा आदेश देणे न्यायोचित वाटत नाही. म्हणून सदरचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होईल. उपरोक्त कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आ दे श**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.04.15 17:04:16 +0530

ठिकाणः कराड ( जे.जे.माने )

दिनांकः १५.०४.२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.